पोलीस अधीक्षक,सातारा यांचे कार्यालय,
९३ मल्हारपेठ,सातारा ४१५००२
दूरध्वनी क्रमांक.०२१६२-२३३८३३,फॅक्स क्रमांक--०२१६२-२३०२३२२
ई-मेल-- sp.satara@mahapolice.gov.in

---

क्रमांक-पशा-४/माहिती अधिकार अधिनियम/नियम-४/२०२५/2958 सातारा दि. २० /०२/२०२५.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.६६ /सहा, दि.१३/०४/२०१८.

२. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र. पोमसं/३६/र.व.का.(८३००)/रामाआ- नागपूर व्दितीय अपील/१४६/२०२४, दि.१५/१२/२०२४.

**विषय :-** माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४(१)(ख) चे अंमलबजावणीबाबत

----ooo----

सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत:हून किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नियम ४ (१) (ख) व नियम ४ (३) मध्ये माहितीचा प्रसार करण्याची पध्दत विहित केली आहे. त्यास अनुसरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम कलम ४(१)(ख) अन्वये पोलीस अधीक्षक, सातारा कार्यालयाकडील खालील प्रमाणे १ ते १७ मुद्दयांची माहिती जनेसाठी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

**१. खात्याची कामकाजाची व कर्तव्याची संपूर्ण माहिती.**

पोलीस अधीक्षक, सातारा यांचे कार्यक्षेत्रात एकूण ३२ पोलीस ठाणे व ८ शाखा सध्या आस्तित्वात आहेत सातारा जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस दलाची त्या त्या कार्यक्षेत्राप्रमाणे सात उपविभागमध्ये विभागणी करणेत आली आहे. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्या त्या विभागातील प्रथम अपिलीय अधिकारी आहेत, सर्व पोलीस ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी हे जन माहिती अधिकारी आहेत. तसेच सर्व शाखा प्रभारी पोलीस अधिकारी हे जन माहिती अधिकारी आहेत.

| अ.क्र | विभाग | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| ०१ | उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग | सातारा शहर,सातारा तालुका,शाहूपुरी, बोरगांव पोलीस ठाणे |
| ०२ | उपविभागीय पोलीस अधिकारी कोरेगांव विभाग | कोरेगांव,पुसेगांव, वाठार,रहिमतपूर पोलीस ठाणे |
| ०३ | उपविभागीय पोलीस अधिकारी वडूज विभाग | वडूज,म्हसवड,दहिवडी, औंध पोलीस ठाणे |
| ०४ | उपविभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग | वाई,महाबळेश्वर,पांचगणी,भुईंज, मेढा पोलीस ठाणे |
| ०५ | उपविभागीय पोलीस अधिकारी फलटण विभाग | फलटण शहर,फलटण तालुका,शिरवळ,खंडाळा, लोणंद पोलीस ठाणे |
| ०६ | उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग | पाटण,ढेबेवाडी,कोयनानागर,मल्हारपेठ पोलीस ठाणे |
| ०७ | उपविभागीय पोलीस अधिकारी कराड विभाग | कराड शहर,कराड तालूका,उंब्रज,तळबीड,मसूर पोलीस ठाणे |

आवक क्रमांक: 62 /2025
सातारा पोलीस ठाणे, सातारा
दिनांक: 20/2/2025

पोलीस अधीक्षक, सातारा कार्यालयातील मंत्रालयीन आस्थापना

प्रत्रव्यवहार शाखा - पोलीस अधिकारी, लिपीक व वर्ग-४ यांची आस्थापना, पोलीस अधिकारी प्रशिक्षण, जडसंग्रह, खरेदी, पोलीस इमारत, शासकिय जमिनीसंदर्भात प्रत्रव्यवहार, विदयुत,पाणी, टेलीफोन, मोटार परिवहन विभागाची देयके मंजूर करणे, माहिती अधिकार पत्रव्यवहार.

पोलीस निरीक्षक,
सातारा शहर पोलीस ठाणे,सातारा

२. लेखाशाखा -वित्तीय मर्यादेचे पालन करुन अनुदान प्राप्त करुन घेणे व अनुदान खर्ची घालने वित्त विषयाची कार्यालयीन कामकाजासंदर्भातील सर्व प्रदाने व अधिकारी/अंमलदार यांना अनुश्रेय वेतन व भत्ते संदर्भातील सर्व प्रदाने बँक मार्फतीने करणे.

३. आस्थापना शाखा - पोलीस अंमलदार यांची आस्थापना, नेमणूका, पदोन्नती, बदल्या, प्रशिक्षण इतर सर्व अभिलेख ठेवणे व त्याबाबतची कार्यवाही करणे.

४. विभागीय चौकशी शाखा - पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे प्राथमिक/विभागीय चौकीशी बाबतचे कामकाज व त्याबाबतचा अभिलेख ठेवणे.

५. अर्जशाखा - वरिष्ठांकडून /जनतेकडून प्राप्त झालेले तक्रार अर्जावरील पत्रव्यवहार.

६. नोंदणी शाखा - वरिष्ठांकडून/जनतेकडून प्राप्त टपाल आवक करणे व बाहेर जाणारे टपाल जावक करणे.

७. वाचक शाखा - जिल्हयातील गुन्हे विषयक अभिलेख ठेवणे,गुन्हे प्रतिबंध, गुन्हे तपासावर पर्यवेक्षण, पोलीस अधिकाऱ्यांच्या कामावर आठवडा पर्यवेक्षण ठेवणे व आवश्यक त्या सुचना देणे.

८. जिल्हा विशेष शाखा - पोलीस बंदोबस्त, जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था, जातीय, राजकीय, आर्थिक, सामाजिक इ. घडामोडी संप, टाळेबंदी, मोर्चे, धरणे, जातीय तंटे, चारित्र्य पडताळणी, परदेशी नागरिकांवर देखरेख, सार्वजनिक निवडणूक बंदोबस्त, अंतर्गत सुरक्षा, अतिमहत्वाच्या व्यक्तींचे दौरे, बंदोबस्त/सुरक्षा इ.

९. पोलीस कल्याण शाखा - पोलीस कर्मचारी यांचेसाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे

१०. पोलीस नियंत्रण शाखा - जिल्हयातील घडामोडी संदर्भातील सर्व माहिती घेवून संबंधितांना देणे.

११. स्थानिक गुन्हे शाखा - जिल्हयातील गंभीर/किरकोळ गुन्हे तात्काळ उघड करणे, अवैध धंदयानां निर्बध घालणे, जिल्हयातील आरोपींवर प्रतिबंधात्मक कार्यवाही/मोका कार्यवाही/ तडीपार कार्यवाही करणे.

१२. पोलीस मुख्यालय व मोटार परिवहन विभाग- जिल्हयातील बंदोबस्त, आरोपी पार्टी, खजिना पार्टी करीता कर्मचारी पुरविणे, शस्त्रगाराची देखरेख ठेवणे, कर्मचाऱ्यांकरिता गणवेष साहित्याचा पुरवठा करणे, कार्यकारी दलातील व नवप्रविष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांचे पोलीस कवायत, प्रशिक्षण सराव नियमितपणे घेणे, वार्षिक गोळीबार सराव करुन घेणे तसेच जिल्हयातील पोलीस वाहनांची मोटार परिवहन विभागामार्फत देखरेख ठेवणे.

१३. वाहतूक नियंत्रण शाखा सातारा शहर- शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवणे, वाहतूकीचे नियोजन व नियंत्रण करण प्रचलित मोटार वाहन कायदयाची अंमलबजावणी करणे, विशेष मोहिम आयोजन करणे, मोटार वाहन चालकांना मार्गदर्शनकामी प्रबोधन करणे.

१४. पोलीस बिनतारी संदेश विभाग- जिल्हयातील बिनतारी संदेश दळणवळण यंत्रणा सुरळीत ठेवणे.

## २. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १,२ व ३, मुंबई पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२, सीआरपीसी-१९७३, वित्तीय अधिकार १९८७, कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तीका, महाराष्ट्र नागरी सेवा नियम-वेतन १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा सेवानिवृत्ती वेतन १९८२, आकस्मित खर्च अधिनियम १९७८ व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रके (भारतीय कायदे, नियमावली, फौजदारी कायदे, महाराष्ट्र नागरी सेवा १९८२) प्रमाणे खात्याचे आधिकार व कर्तव्य आहेत. सर्व अधिकारी व त्यांचे अधिपत्याखालील कर्मचारी यांना त्यांचे अधिकारांची जाणीव करुन देण्यात आलेली आहे. जनेतच्या

येणाऱ्या तक्रारीचे निरसण ते स्वतः करतात व कर्मचाऱ्यांचेकडून करवून घेतात व उद्भणारे परिस्थितीतीनुसार कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळतात.

**३. निर्णय घेण्याचे अधिकार व जबाबदारी**

जिल्हा स्तरावर पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक व उपविभागीय स्तरावर उपविभागीय पोलीय अधिकारी हे कायादयाचे कार्यक्षेत्रात राहून नियमानुसार निर्णय घेतात व आपली जबाबदारी पारदर्शकपणे पार पाडतात. तसेच आवश्यक त्या ठिकाणी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेतले जाते.

**४. कामकाजाची पध्दत**

पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) हे आपले कार्यालयातील नियमीत हजर राहून कामकाज स्वतः व आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून करवून घेतात जिल्हयातील पोलीस ठाणेकडून दाखल झालेल्या गुन्हयांची व इतर माहिती दररोज घेतात व ती पडताळणी करतात कार्यालयास प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जावर तक्रारदारांचे म्हणणे ऐकूण तक्रारीचे निवारण करणेसाठी ज्या त्या विभागातील उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांना आदेश देऊन तक्रारीचे निवारण करतात. जिल्हयातील घडलेल्या गुन्हयांत तपासासाठी मार्गदर्शन करतात. जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे, शरीराविरुध्द व मालमत्ता विरुध्द गुन्हयांना आळा घालणे व आवश्यकतेनुसार कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करणे इ. कामकाज केले जाते.

**५. खात्याच्या अधिकारात येणारे नियम, परिपत्रके, सुचना**

पोलीस अधीक्षक हे त्यांना प्राप्त असणाऱ्या अधिकारांची अंमलबजावणी पारदर्शकपणे पार पाडतात. वरिष्ठ कार्यालयाकडून येणारी परिपत्रके व सुचना यांची अंमलबजावणी करणेबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांना सुचना देतात. पोलीस अधीक्षक यांचेकडून वेळोवेळी दैनंदिन कामकाज गुन्हे तपास इत्यादीबाबत अंमलबजावणी सुचना करण्यात येतात.

**६.खात्याच्या अधिकारात येणारी कागदपत्रे**

गुन्हे, मयत, अपघात या प्रकारचे तपास कागदपत्रे, दाखल होणारे वरिष्ठ व स्थानिक अर्ज चौकशीची कागदपत्रे, वरिष्ठ कार्यालयाकडून येणारी परिपत्रके, सुचना इ. कागदपत्रे तसेच पोलीस ठाणेकडून/ कार्यालयाकडून करणेत येणारे पत्रव्यवहारांच्या प्रती, तपासच्या केस डायऱ्या, पोलीस अधिकारी व अंमलदारांचे अभिलेखांची त्या त्या प्रमाणे वर्गवारी करुन ठेवणेत येतात.

**७. सल्ला मसलतीसाठी यंत्रणा व जनतेच्या मार्गदर्शनाची कार्यपध्दती**

पोलीस अधीक्षक कार्यालयात कामकाजात येणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्याकरिता कार्यालयात विधी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी शांतता कमिटी मोहल्ला कमिटी, तंटामुक्त गाव अभियान, पोलीस मित्र योजना पोलीस ठाणे स्तरावर राबविणेत येत आहेत. काही समस्या उद्भवलेस संबंधित नेत्यांची बैठक घेतली जाते.

८.जनतेसाठी खाते अंतर्गत स्थापनेत आलेल्या समित्या व त्यांच्या कार्यपध्दती .

पोलीस ठाणे स्तरावर महिला दक्षता समिती, गुन्हे नियंत्रण समिती, मोहल्ला कमिटी, शांतता समिती, तंटामुक्त समिती, ग्रामसुरक्षा दले, पोलीस मित्र इत्यादी समित्या व कमिटी स्थापन करणेत आलेल्या असून त्यांचे सुचना घेऊन त्याचप्रमाणे त्यांचे कामकाजाचा आढावा घेवून मार्गदर्शन करण्यात येते.

९. खात्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे नावांची सूची

पोलीस अधीक्षक, सातारा घटकातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे नावांची यादी पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणेकडे नेमणूकीस असले अधिकारी यांचे नावांचे फलक लावणेत आले आहेत.

१०. खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती/भरपाई इत्यादी

जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणेकडील लेखनिक पोलीस हवालदार यांचेकडे/पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथे अधकारी कर्मचाऱ्यांना उपलब्ध आलेली मासिक प्राप्ती इत्यादीबाबतची माहिती उपलब्ध करुन ठेवणेत आलेली आहे.

११. खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना खार्चाच्या तरतूदी व वापर

पोलीस अधीक्षक, सातारा घटकाच्या विनियोगासाठी शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधचा विनियोग शासनाने विहित केलेल्या नियमानुसार खर्च केला जातो.

१२. सबसिडी उपलब्ध असलेस ती माहिती कार्यक्रम व लाभार्थी बाबतची माहिती.

सदरची माहिती निरंक आहे.

१३. सवलती परवाने अधिकार याबाबत जे अधिकार आहेत ती माहिती

पोलीस अधीक्षक हे त्यांना प्राप्त असलेलया अधिकारान्वये ते अंमलबजावणी करतात व ज्या प्रकरणी त्यांना अधिकार प्राप्त नाहित अशी प्रकरणे ते चौकशी करुन पुढील कार्यवाहीकरिता वरिष्ठ कार्यालयाकडे अथवा महाराष्ट्र शासनाकडे सादर करतात.

१४. इलेक्ट्रीक माध्यमाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती.

महाराष्ट्र पोलीस दलाची माहिती www.mahapolice.com_या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. व सातारा पोलीस दलाची माहिती www.satatapolice.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१५. नागरीकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा कार्यालयाची वेळ व लायब्ररीची माहिती

नागरीकांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेली माहिती त्यांना मागणीप्रमाणे माहिती अधिकार नियमास अनुसरुन पुरविली जाते.

## १६. माहिती अधिकाऱ्यांची नांवे पदनाम व अन्य माहिती

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीकरीता महाराष्ट्र राज्यामध्ये पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहाय्क जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे मंत्रालय विभाग निहाय माहिती.

| अ.क्र | घटकाचे नाव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | सातारा विभाग | ---- | उप विभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग | अपर पोलीस अधीक्षक सातारा |
| ०२ | वाई विभाग | ----- | उप विभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग वाई | |
| ०३ | दहिवडी विभाग कॅम्प वडूज | ---- | उप विभागीय पोलीस अधिकारी दहिवडी विभाग कॅम्प वडूज | |
| ०४ | पाटण विभाग | -- | उप विभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग पाटण | |
| ०५ | कराड विभाग | --- | उप विभागीय पोलीस अधिकारी कराड विभाग कराड | |
| ०६ | फलटण विभाग | --- | उप विभागीय पोलीस अधिकारी फलटण विभाग फलटण | |
| ०७ | सातारा ग्रामीण विभाग कॅम्प कोरेगाव | --- | उप विभागीय पोलीस अधिकारी सातारा ग्रामीण विभाग कॅम्प कोरेगांव | |
| ०८ | पोलीस उपअधीक्षक (गृह)सातारा | --- | पोलीस उपअधीक्षक (गृह)सातारा | |
| ०९ | आर्थिक गुन्हे शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी आर्थिक गुन्हे शाखा | |
| १० | सातारा शहर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी सातारा शहर पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग सातारा |
| ११ | सातारा तालुका पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी सातारा तालुका पोलीस ठाणे | |
| १२ | बोरगांव पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी बोरगांव पोलीस ठाणे | |
| १३ | शाहुपुरी पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी शाहुपुरी पोलीस ठाणे | |
| १४ | वाई पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी वाई पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग वाई |
| १५ | महाबळेश्वर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी महाबळेश्वर पोलीस ठाणे | |
| १६ | पाचगणी पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी पाचगणी पोलीस ठाणे | |
| १७ | मेढा पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी मेढा पोलीस ठाणे | |
| १८ | भुईंज पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी भुईंज पोलीस ठाणे | |

| अ.क्र | घटकाचे नाव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १९ | वडुज पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी वडूज पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी दहिवडी विभाग कॅम्प वडूज |
| २० | दहिवडी पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी दहिवडी पोलीस ठाणे | |
| २१ | म्हसवड पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी म्हसवड पोलीस ठाणे | |
| २२ | औंध पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी औंध पोलीस ठाणे | |
| २३ | पाटण पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी पाटण पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग |
| २४ | ढेबेवाडी पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी ढेबेवाडी पोलीस ठाणे | |
| २५ | कोयनानगर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी कोयनानगर पोलीस ठाणे | |
| २६ | मल्हारपेठ पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी मल्हारपेठ पोलीस ठाणे | |
| २७ | कराड शहर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी कराड शहर पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी कराड विभाग |
| २८ | कराड तालुका पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी कराड तालुका पोलीस ठाणे | |
| २९ | उंब्रज पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी उंब्रज पोलीस ठाणे | |
| ३० | तळबीड पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी तळबीड पोलीस ठाणे | |
| ३१ | मसूर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी मसूर पोलीस ठाणे | |
| ३२ | फलटण शहर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी फलटण शहर पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी फलटण विभाग |
| ३३ | फलटण ग्रामीण पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी फलटण ग्रामीण पोलीस ठाणे | |
| ३४ | खंडाळा पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी खंडाळा पोलीस ठाणे | |
| ३५ | शिरवळ पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी शिरवळ पोलीस ठाणे | |
| ३६ | लोणंद पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी लोणंद पोलीस ठाणे | |
| ३७ | कोरेगांव पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी कोरेगांव पोलीस ठाणे | उप विभागीय पोलीस अधिकारी फलटण विभाग |
| ३८ | पुसेगांव पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी पुसेगांव पोलीस ठाणे | |
| ३९ | रहिमतपुर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी रहिमतपुर पोलीस ठाणे | |
| ४० | वाठार पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी वाठार पोलीस ठाणे | |

| अ.क्र | घटकाचे नाव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| ४१ | सायबर पोलीस ठाणे | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे सातारा | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय सातारा) |
| ४२ | पोलीस मुख्यालय सातारा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी पोलीस मुख्यालय सातारा | |
| ४३ | स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सातारा | |
| ४४ | जिल्हा विशेष शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी जिल्हा विशेष शाखा सातारा | |
| ४५ | मोटार परिवहन विभाग | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी मोटार परिवहन विभाग सातारा | |
| ४६ | नियंत्रण कक्ष सातारा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी नियंत्रण कक्ष सातारा | |
| ४७ | बिनतारी संदेश विभाग सातारा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी बिनतारी संदेश विभाग सातारा | |
| ४८ | वाहतुक नियंत्रण शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी वाहतुक नियंत्रण शाखा सातारा | |
| ४९ | जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा सातारा | |
| ५० | बॉम्ब शोधक व नाशक पथक सातारा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी बॉम्ब शोधक व नाशक पथक सातारा | |
| ५१ | पोलीस कल्याण शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी पोलीस कल्याण शाखा सातारा | |
| ५२ | वाचक शाखा | दुय्यम अधिकारी | प्रभारी अधिकारी वाचक शाखा | |
| ५३ | पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा (पत्रव्यवहार शाखा, लेखा शाखा,आस्थापना शाखा, विभागीय चौकशी शाखा, नोंदणी शाखा ) | संबंधीत शाखा प्रमुख | कार्यालय अधीक्षक,सातारा | |

**१७. खात्याने निश्चित केलेल्या अन्य संबंधीची माहिती**

दारिद्र रेषेखालील अर्जदार यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मोफत उपलब्ध करुन देणेत येत आहे. पोलीस ठाणेकडून जनतेला लवकर माहिती उपलब्ध करुन देणे याबाबत सर्व पोलीस ठाणे अधिकारी/ कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना कळविणेत आलेले आहे.

**(पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

( अतुल सबनीस )
पोलीस उपअधीक्षक,(मुख्यालय) सातारा.

प्रति,
पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे
२/- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत वरील प्रमाणे माहिती पोलीस अधीक्षक, सातारा घटकाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.